# को- ऑप. हौसिंग सोसायटी असलेल्या आस्थपना / इमारतींच्यां सुरक्षेबाबत करावयाच्या उपाययोजना

१) हौसिंग सोसायटी चे कंपाउंडची भिंत मजबुत करावी व त्यावर काटेरी तारेचे कुंपण बसवुन द्यावे.

२) हौसिंग सोसायटीमध्ये येण्याजाण्यासाठी एकापेक्षा जास्त प्रवेशव्दार असल्यास इतर सुरक्षेची सर्व काळजी घेण्यात यावी.

३) हौसिंग सोसायटीमधील सर्व फ्लॅटस्च्या प्रवेशव्दारांना लोखंडी दरवाजे व चांगल्या दर्जाचे कुलुप लावलेले असावे.

४) हौसिंग सोसायटीमध्ये सर्व ठिकाणी पुरेशी प्रकाश व्यवस्था असावी.

५) मुख्य प्रवेशव्दाराकडे तसेच हौसिंग सोसायटीमधील सर्व बाजु टिपु शकतील अशा प्रकारे सी सी टि व्ही कॅमेरे बसवावेत.

६) हौसिंग सोसायटीच्या क्षेत्रानुसार योग्य प्रमाणत सुरक्षा रक्षक नेमुन सोसायटी मध्ये येणाऱ्या व्यक्तिंबाबत नोंदी घेण्यात यावे.

७) हौसिंग सोसायटीमध्ये नेमण्यात आलेल्या सुरक्षा रक्षकांची चारित्र्य पडताळणी करुन त्यांची वैयक्तिक माहिती घेऊन त्यांच्या नोंदी सोसायटी कार्यालयात करुन ठेवावी.

८) रात्रगस्तीच्या वेळी सुरक्षा रक्षक आपले कर्तव्य व्यवस्थित बजावत आहेत किंवा नाहित याबाबत सोसायटीच्या कार्यालयास कळवावे व नोंद घ्यावी.

९) सोसायटी सुरक्षारक्षकांकडे जवळील पोलीस ठाण्याचा दुरध्वनी क्रमांक असणे आवश्यक आहे.

१०) हौसिंग सोसायटीमध्ये आपतकालीन वेळी पोलीस ठाण्याशी तात्काळ संपर्क होईल अशी अर्लाम सिस्टिम लावण्यात यावी.

११) हौसिंग सोसायटी मध्ये नेहमी येणारे वर्तमान पत्र विक्रेते, सफाई कामगार , ड्रायव्हर , धोबी भाजी विक्रेते , यांची वेगळी यादी तयार करावी.

१२) परगावी जाताना स्थानिक पोलीस ठाणेस तसेच शेजाऱ्यांस कळवावे, मौल्यवान वस्तु पैसे दागिने हे बँकेच्या लॉकर मध्ये ठेवावेत.

१३) सोसायटी मध्ये ईमरजन्सी लाईट व्यवस्था असावी.

## २) को-ऑप.हौसिंग सोसायटी अस्तित्वात असलेल्या आस्थापना / इमारतीच्यां सुरक्षेबाबत काय करू नये –

१) घराला लावण्यात येणारे ग्रील हे हलक्या प्रतिचे नसावे.

१) रात्रीचे वेळी घराचा दरवाजा उघडतांना बाहेरील व्यक्तिची ओळख पटल्याशिवाय दरवाजा उघडू नये.

२) को-ऑप हौसिंग सोसायटीमध्ये पडीक / निर्जन भाग ठेवु नये.

३) घरात अनावश्यक मौल्यवान वस्तु व दागिने, पैसे न ठेवता ते बँकेतील लॉकरमध्ये ठेवावेत.

४) अनोळखी व्यक्ती, सेल्समन, सेल्यगर्ल किंवा फिरते विक्रेते यांचेवर विश्र्वास ठेवू नये, उदा. सोने उजळून देणारे इत्यादी.

५) अनोळखी व्यक्ति तसेच काही कारणे सांगून येणारे व्यक्तिंची शहानिशा केल्याशिवाय अजिबात प्रवेश देवू नये.

६) मौल्यवान वस्तु उघड्यावर अथवा खिडकीजवळ त्या सहज काढून घेता येतील अशा जागी ठेवू नये.

७) पोलीस ठाणेकडून चारित्र्य पडताळणी केल्याशिवाय सुरक्षा रक्षक नेमू नये.

# १) खाजगी कार्यालयामध्ये काय करावे याबाबत

१) अस्तित्वात असलेले कार्यालय आर्थिक व्यवहार असलेले कार्यालय (बँक, पतसंस्था, चीटफंड, इत्यादी) इमारती सुरक्षा ऑडीट करून कमतरता असलेल्या बाबी उदा.एकच प्रवेशद्वार त्यांस **Z** टाईप प्रवेशद्वार व एक्झीट ठेवावे.

२) खिडक्या व दरवाजे यांच्या ग्रिल्स स्क्रुवर फिट केलेल्या नसाव्यात, तर त्या इमारतीचे भिंतीत फिक्स कराव्यात.

३) सेंट्रल लॉक सिस्टीम व सी.सी.टी.व्ही.यंत्रणा नसेल तर कार्यालयाच्या आतील व बाहेरील बाजुस बसवुन घ्यावी.तसेच **ALARM** व्यवस्था असावी.

४) कॅश काऊंटर जाळीचे असावे व आर्थिक व्यवहार चालणाऱ्या कार्यालयामध्ये आवश्यकतेप्रमाणे बंदुक परवानाधारक सुरक्षा नेमावा.

५) आपात्कालीन परिस्थिती संबंधाने उपाययोजना करण्याचे दृष्टीने कार्यालयाने ठिकाणी अंतर्गत रस्ते पुरेशे रुंदीचे आसावेत.

६) भिंती व स्ट्राँगरून भक्कत व कार्यालयांचे प्लॅस्टर करतेवेळी त्यामध्ये जाळी टाकुन करावे.

७) कार्यालयात नेमण्यात येणारे सुरक्षा रक्षक यांचे चारीत्र्य पडताळणी करून त्यांचे फोटो, वैयक्तिक माहितीची स्वतंत्र फाईल ठेवावी.

८) कार्यालयामध्ये येणारे इसमांची नोंदणी/माहिती नेमण्यात येणारे सुरक्षा रक्षक यांचेकडे ठेवावी.

९) खाजगी कार्यालयामध्ये काही घटना घडल्यास अशा वेळी पोलीस ठाणेस / चौकीस तात्काळ संपर्क होईल अशी स्वयंचलीत अलार्म सिस्टीम ठेवण्यात यावी व त्याची बटणे दोन ते तीन ठिकाणी ठेवावेत.

## २) खाजगी कार्यालयामध्ये काय करू नये

१) कार्यालयांस बाहेर जाणारे व येणारे अनेक गेट असु नयेत.

२) आर्थिक व्यवहार चालणा-या कार्यालयांमध्ये रोख रक्कम घेवुन जाताना एकाच व्यक्तीवर जबाबदारी सोपवू नये.

## १) धार्मिक स्थळांच्यां सुरक्षेच्या दृष्टीने

दहशतवादी संघटनांकडुन संभाव्य अतिरेकी हल्ले, समाजकंटक यांचेकडून होणा-या धार्मिक स्थळांची विटंबना, होणा-या धार्मिक स्थळामधील चो-या, या अनुषंगाने आपल्या अधिपत्याखाली धार्मिक स्थळाच्या सुरक्षेच्या दृष्टीने खालील नमुद प्रमाणे साधन सामुग्री मनुष्यबळ तैनात करावी. सदरचे पत्र मिळताच प्राधान्याने अंमलबजावणी करावी.

१) धार्मिक स्थाळामध्ये येणा-या प्रत्येक भावीकाची प्रवेशद्वारावरच बारकाईने तपासणी होणे आवश्यक आहे. त्यासाठी आपले स्वयंसेवक यांची नेमणुक करुन धातुशोधक यंत्राणे (एच.एच.एम.डी / डि.एफ.एम.डी) घातपात विरोधी तपासणी करावी. व साहीत्याची तपासणी करण्यासाठी एक्सरे स्कॅनर बसवावा.

२) सुरक्षा रक्षकाची नेमणुक मान्यता प्राप्त संस्थेकडुन करावी. सुरक्षा रक्षकाची चारित्र्य पडताळणी करून घ्यावी. (२४X७) अशी २४ तास पूर्ण वेळ सुरक्षा व्यवस्था नेमावी.

२) धार्मिक स्थळाचे अंतर भागातील व बाहेरील परिसरातील आढावा घेण्यासाठी उच्चक्षमतेचे नाईट व्हीजन सीसीटिव्ही कॅमेरे प्राधान्याने बसवावे. त्यामध्ये जास्तीत जास्त व जास्त कालावधी साठी फुटेज सेव्ह करण्याची क्षमता असावी.

३) धार्मिक स्थळामध्ये पर्यायी वीज पुरवठा सुस्थितीत व सुसज्ज असावा.तसेच आवश्यक तेवढे अग्निशामक सामुग्री बसवावी.,

४) धार्मिक स्थळामध्ये येणा-या भाविकांना कॅमेराद्वारे किंवा मोबाईल फोनद्वारे फोटो घेण्यास सक्त मनाई आपल्या स्वयंसेवकामार्फत वेळोवेळी करावी.  दर्शनीय भागावर तसे बोर्ड लावावे.

५) आपले स्वयंसेवक कर्तव्यदक्ष व सतर्क असावेत. त्यासाठी आपण व आपल्या पदाधिका-यांनी त्यांच्यावर सोपविलेली जबाबदारी वेळचेवेळी चेक करावी.

६) स्वयंसेवक तथा सुरक्षा रक्षक यांना सुरक्षा विषयक साधन सामुग्री हातळण्याचे प्रशिक्षण दयावे.

७) आपल्या धार्मिक स्थळात अनोळखी व्यक्ति येणार नाही याची दक्षता घ्यावी. अशी अनोळखी व्यक्ति निदर्शनास आल्यास त्यास ताब्यात घ्यावे. पोलीसांना कळवावे. तसेच त्याबाबत काही माहीती मिळाल्यास ती माहीती तात्काळ नजकीचे पोलीस चौकी यांना कळवावी.जेणेकरुन सदर व्यक्ती त्याचे मनसुबे पुर्ण करण्यापुर्वीच पकडणे व कायदेशीर कारवाई करणे शक्य होईल.संशयास्पद वस्तु बाबत देखील माहीती दयावी.

८) धार्मिक स्थळालगत कोणीही नागरीक रस्त्यावर थांबुन दर्शन घेणार नाही.नागरीकांची गर्दी सतत पुढे जात राहील याची व्यवस्था करावी.

९) धार्मिक स्थळांचे जवळपास (२०० मीटरचे आत) कोणतेही प्रकारचे दुचाकी अथवा इतर कोणतेही प्रकारचे वाहन पार्क केले जाणार नाही याची दक्षता घ्यावी.

१०)धार्मिक स्थळालगत नारळ,फुले व पुजा साहीत्य विक्रीचे स्टॉल किंवा पथारी लागणार नाही याची दक्षता घ्यावी.

११)धार्मिक स्थळाचे पावित्र्य अहोरात्र राखले जाईल या दृष्टीने दिवसा व रात्री पुरेशा संख्येत स्वयंसेवक धार्मिक स्थळामध्ये व लगतच्या परिसरात नेमावे.

१२)मंदीरामधील देवी/देवतांचे अंगावर आभुषणे (सोन्या/चांदीचे दागीने) व दानपेटी असल्यास त्याचे देखरेखीसाठी (२४X७) अशी २४ तास पूर्ण वेळ स्वयंसेवक नेमावेत, व सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून उपाययोजना कराव्यात. (उदा. अलार्म)

१३)पोलीस नियंत्रण कक्ष फोन नं., २६१२२८८०, १०० व हद्दीतील पोलीस ठाणे आणि अधिका-यांचे मोबाईल नंबर सर्वांना दिसतील अश्या मंदीराचे बाहेरील दर्शनीय भागावर उपलब्ध ठेवावे.

१४)आपले धार्मिक स्थळास पाळीव प्राणी किंवा वाहनांपासून विटंबना अथवा नुकसान होण्याची शक्यता असल्याने धार्मिक स्थळाचे बाहेरील बाजुस सुरक्षा रक्षक भिंत असावी.

१५)धार्मिक स्थळाचे मुर्तीचे अंगावर सोन्या चांदीचे दागिने मौल्यवान वस्तू अथवा दानपेटी रात्रीचे वेळी मंदिरात ठेवू नयेत, सुरक्षित ठिकाणी ठेवावेत ज्या दिवशी मुर्तीचे अंगावर सोन्या चांदीचे दागिने मौल्यवान वस्तू असतील सदर दिवशी सर्व सुरक्षा व्यवस्था आपण स्वतः व कार्यकर्ते यांनीच करावी.

वरिल प्रमणे आपले धार्मिक स्थळ सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी आपलीच असल्याने वरील सूचनांचे पालन न केल्यास,हयगय व दुर्लक्ष केल्यास सदर ठिकाणी काही अनूचित प्रकार घडल्यास याची सर्वस्वी जबाबदारी मंडळांचे, मंदीर, मशिद व्यवस्थापनेचे अथवा विश्वस्त/ट्रस्टी यांचीच असेल व त्यांनाच याबाबत सर्वस्वी जबाबदर धरण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.